महाराष्ट्र शासन

# उपनिबंधक, सहकारी संस्था, मिरज यांचे कार्यालय

शामराव बंडोजी पाटील दुय्यम बाजार आवार स्टेट बँकेच्या मागे, मार्केट यार्ड, मिरज

फोन नं. 0233-2223118

Email- drcsmiraj@rediffmail.com

---

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७अ अन्वये आदेश

२९८५ जाक्रं./उनिमि/का.क. ७७ अ आदेश/सन- २०१८

दिनांक:- १९/१/२०१८

वाचले :-

१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे का.क. ७७ अ मधील तरतुद

२) श्री.एस.एस.बोगार निवडणूक निर्णय अधिकारी गोमटेश अल्पसंख्यांक वस्त्रोद्योग सहकारी संस्था मर्या.एरंडोली यांचा दि.२३/१०/२०१५ रोजीचे पत्र.

---

ज्याअर्थी, गोमटेश अल्पसंख्यांक वस्त्रोद्योग सहकारी संस्था मर्या.एरंडोली ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कायदयातील तरतुदीनुसार नोंदविणेत आलेली सहकारी संस्था असुन सदर संस्था या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात व अधिकारकक्षेत येते. (यापुढे सदर संस्थेच्या नावाचा उल्लेख संस्था असा करणेत येईल)

ज्याअर्थी, वाचले क्र.२ अन्वये श्री.एस.एस.बोगार निवडणूक निर्णय अधिकारी गोमटेश अल्पसंख्यांक वस्त्रोद्योग सहकारी संस्था मर्या.एरंडोली यांनी अहवाल सादर केला आहे.सदर अहवालात त्यांनी संस्थेचा निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करणेत आला होता परंतु मतदार यादी वेळेत प्राप्त न झाल्यामुळे निवडणूक कार्यक्रम वेळेत घेता आले नसलेचे कळविले आहे.

ज्याअर्थी उक्त संस्थेची निवडणूक प्रक्रिया घेणेस आस्था नसलेचे दिसून येत असल्यामुळे संस्थेवर संचालक मंडळ निवडून न आल्यामुळे संस्थेचे कामकाज ठप्प झाले आहे. संस्थेच्या व्यवस्थापनामध्ये पोकळी निर्माण झाली असल्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ मधील तरतुदीनुसार संस्थेचे कामकाज पाहणेसाठी संस्थेवर प्राधिकृत अधिकारी नेमणे आवश्यक झालेची खात्री झाली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारास अनुसरुन मी डॉ.प्र.अ.बागल, उपनिबंधक, सहकारी संस्था मिरज गोमटेश अल्पसंख्यांक वस्त्रोद्योग सहकारी संस्था मर्या.एरंडोली या संस्थेचे कामकाज पाहणेसाठी प्राधिकृत अधिकारी म्हणून माळी पी.यु. मुख्य लिपीक अधिन उपनिबंधक,सहकारी संस्था,मिरज यांची नियुक्ती करीत आहे. प्राधिकृत अधिकारी यांचा कालावधी ६ महिन्यांचा असून त्यांनी त्वरित दप्तरी चार्ज घेवून तसा अहवाल सादर करावा.

सदरचा आदेश आज दिनांक १९/०१/२०१८ रोजी माझी सही व कार्यालयीन शिक्यानिशी दिला आहे.

DEPUTY REGISTRAR CO.OP. SOCIETIES, MIRAJ TALUKA उप निबंधक, सहकारी संस्था, मिरज तालुका. जिल्हा सांगली DIST. SANGLI

१९/१/१८

( डॉ.प्र.अ.बागल)
उपनिबंधक
सहकारी संस्था,मिरज

ठिकाण-मिरज
दि.१९/१/२०१८

प्रति,

१)चेअरमन/सचिव,
गोमटेश अल्पसंख्यांक वस्त्रोद्योग सहकारी संस्था मर्या.एरंडोली

२/- संस्थेचे सर्व दप्तर प्राधिकृत अधिकारी यांचे ताब्यात देऊन चार्ज यादीसह अहवाल या कार्यालयास सादर करावा

२) माळी पी.यु. मुख्य लिपीक तथा प्राधिकृत अधिकारी गोमटेश अल्पसंख्यांक वस्त्रोद्योग सहकारी संस्था मर्या.एरंडोली संस्थेचा दप्तरी व मालमत्तेचा ताबा घेवून चार्ज यादीसह अहवाल या कार्यालयास सादर करावे.

३) शाखाधिकारी सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा –

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१) मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,सांगली

२) मा.जिल्हा विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था सांगली

१९/१/१८

उपनिबंधक
सहकारी संस्था,मिरज

Scanned by CamScanner